# रनवे टेक ऑफ स्टार्टअप चॅलेंज खंडागळेने जिंकली




**मुंबई :** नवोदित उद्योजक अभिजीत खंडागळे यांने नुकतीच आयोजित रनवे टेक ऑफ स्टार्टअप चॅलेंज या देशव्यापी स्पर्धेची दुसरी आवृत्ती जिंकली आहे. अभिजीत खंडागळे याला हा पुरस्कार त्याच्या शिक्षण क्षेत्रातील स्टार्टअप 'एकत्रा'साठी मिळाला आहे. एकत्रा हे एक जनरेटिव्ह एआय प्लॅटफॉर्म आहे जे एसएमएस व व्हॉट्सॲपवरील मजकुराचा वापर करून विद्यार्थ्यांना एक हायपर-पर्सनलाइज्ड शिक्षणाचा अनुभव देतो.

या स्पर्धेच्या परीक्षकांना अभिजीत खंडागळे यांचे नावीन्यपूर्ण व्यवसाय मॉडेल व शिक्षण क्षेत्रातील हा अभिनव उपक्रम खूप भावला. अभिजीत खंडागळे याला स्पर्धेचा विजेता म्हणून अडीच लाख रुपयांचे रोख पारितोषिक मिळाले आहे. तसेच मूळचा नागपूरचा अभिजीत खंडागळे याचा स्टार्टअप हा लो-डेटा प्लॅटफॉर्म सादर करणारा शिक्षण क्षेत्रातील पहिला स्टार्टअप ठरला आहे. तसेच अभिजीतला वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम व डेलॉइटच्या वर्ल्डक्लास इनोव्हेशन चॅलेंजद्वारे शिक्षणात प्रवेश सुधारण्याच्या कामासाठी एक टॉप इनोव्हेटर म्हणून नियुक्तसुद्धा केले गेले आहे. याप्रसंगी अभिजीत म्हणाला की, रनवे टेक ऑफ चॅलेंजमध्ये भाग घेणे हा माझ्यासाठी एक अद्‌भुत अनुभव होता. या उपक्रमात माझ्या संकल्पनेमध्ये अनेकांनी स्वारस्य दाखवले आहे.

रनवे टेक ऑफ स्टार्टअप चॅलेंज ही स्पर्धा यूपीईएस स्कूल ऑफ बिझनेस आणि रनवे इनक्युबेटर यांनी पर्ल अकादमीच्या भागीदारीत आयोजित केली होती. आतापर्यंत रनवे इनक्युबेटरने ३७ नावीन्यपूर्ण स्टार्टअप्सना अनुदान दिले आहे. जोडीला एड-टेक, सोशल इम्पॅक्ट, हेल्थकेअर आणि बायोटेक, डी टू सी, फिनटेक, एआय/एमएल, फॅशन आणि लाइफस्टाइल यांसारख्या विविध क्षेत्रांत २०० हून अधिक अनोखे स्टार्टअप्स सुरू केले आहेत.